“सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, मानव्य विद्याशाखे अंतर्गत सादर केलेल्या विद्यावाचस्पती प्रबंधांचे उल्लेख विश्लेषण”

Citation Analysis of Doctoral Dissertation in the Subject of Humanities Submitted to Savitribai Phule Pune University, Pune

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आंतरविद्या शाखेअंतर्गत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

परमेश्वर माणिकराव इंगळे

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र

मार्गदर्शक

प्रा. डॉ. डी. टी. घटकार

संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट

संशोधन केंद्र

माध्यमशास्त्र संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सप्टेंबर २०२२

“सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे मानव्य विद्याशाखे अंतर्गत सादर केलेल्या विद्यावाचस्पती प्रबंधांचे उल्लेख विश्लेषण”

<u>प्रस्तावना :-</u>

संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तत्त्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तथ्ये यांचे पुनःपुन्हा परिक्षण करण्यासाठी केलेला चिकित्सक व पध्दतशीर अभ्यास होय. आजचे युग हे माहितीचे युग आहे. माहितीच्या उपभोक्त्यांच्या माहितीविषयक गरजांमध्ये व उपभोक्त्यांच्या वाचनविषयक सवयींमध्ये दिवसेंदिवस बदल होत आहे. आधुनिक ग्रंथालयात वाचकांच्या मागणीला अनुसरून वाचनसाहित्याचा संग्रह ग्रंथालयात असणे आवश्यक आहे. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र हे एक सामाजिक शास्त्र आहे. ग्रंथालये अस्तित्वात येण्यामागे ज्ञानसंग्रह हा सर्वात महत्वाचा हेतू आहे, पण यासोबतच ज्ञानाचा प्रसार व प्रचार, समाजप्रबोधन आणि मनोरंजन हा सुध्दा एक हेतू होता. संशोधन ही शोधाची जननी असून शंका ही संशोधनाची प्रेरणा आहे आणि शंकेचे समाधान हे संशोधनाचे कार्य आहे.

बिब्लीओमॅट्रीक ही संकल्पना अगदी अलिकडेच अस्तित्वात आली आहे. ज्ञान आणि माहिती साधनाच्या प्रकाशनात झालेली अमर्याद वाढ आणि प्रकाशित साहित्य ग्रंथालयांना संपादन करताना भासणारी आर्थिक अडचण, यांचा विचार करता ग्रंथ संग्रहाच्या व्यवस्थापनाच्या कार्यात झालेली वाढ, यामुळे गेल्या ५० वर्षात ग्रंथालय व माहिती शास्त्रात एक वेगळा दृष्टिकोन पुढे आला यामुळे ग्रंथालयात येणारे ग्रंथ आणि ग्रंथेत्तर साहित्यात झालेल्या विशिष्ट विषयाचा प्रकाशन विस्तार लेखकांच्या संदर्भनिर्मितीच्या रीती, लेखकांचे लेखनातील उत्तरदायित्व, ग्रंथालयाचा उपयोग करण्यासाठी कार्यपध्दती आणि त्यामुळे त्यांच्या निर्माण होणा-या माहिती विषयक गरजा या सर्वांचा संख्यात्मक अभ्यास १९४८ पासून मोठया प्रमाणावर करण्यात आला. संशोधनाच्या या प्रक्रियेतून काही नविन सिध्दांताची निर्मिती झाली आणि नविन अशा सिध्दांतात ब्रॅडफर्ड यांनी मांडलेला विषय विस्तार सिध्दांताच्या अनुषंगाने ग्रंथालय व माहितीशास्त्रात बिब्लीओमॅट्रीक्स या तंत्राची निर्मिती झाली.

उल्लेख विश्लेषणाआधारे ग्रंथालय व ग्रंथालयीन साहित्य यांचे मोजमाप अतिशय सोप्या पध्दतीने केले जाते. उल्लेख विश्लेषणाव्दारे क्लिष्ट अडचणींना सहजरित्या सोडविता येते. या तंत्राचा उपयोग राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विषयाचा विस्तार मोजण्यासाठी मोठया प्रमाणात केला जात आहे. या पध्दतीद्वारे लिखित संप्रेषण क्रियेत संशोधकाने संशोधन करण्यासाठी संग्रहीत केलेली माहिती ही वेगवेगळया स्वरुपात असते. त्यामुळे योग्य व्यवस्थापनात निर्णय घेणे शक्य नसते, परंतु बिब्लीओमॅट्रीक या तंत्राद्वारे अडचणीवर पर्याय शोधला जाऊ शकतो. बिब्लीओमॅट्रीक्स या तंत्राची निर्मिती पध्दती ही संदर्भ उल्लेख विश्लेषण आणि आशय विश्लेषण या दोन पध्दतीव्दारा उपयोगात आणली जाते.

उल्लेख विश्लेषण :-

उल्लेख म्हणजे एखाद्या विशिष्ट विषयात पूर्वी मांडले गेलेले मत उदधृत करणे आणि अशा विशिष्ट विषयातील निरनिराळया प्रलेखांमधील उल्लेखांचा संख्यात्मक अभ्यास करणे होय. संशोधक आपल्या संशोधनात्मक लेखनात काही मते मांडत असतो. आपले विचार मांडत असतो. त्यासाठी तो इतर लेखकांच्या मताचा किंवा विचारांचा आधार घेत असतो. हे करत असताना तो यासंदर्भातील नोंदी करत असतो. ही नोंद म्हणजेच उल्लेख होय. उल्लेखांनाच तळटीप व संदर्भ ही नावे देखील आहेत. या उल्लेखांचा विशिष्ट निकषांवर अभ्यास केला जातो. या अभ्यासालाच उल्लेख विश्लेषण असे म्हणतात. संशोधक आपल्या संशोधनामध्ये ज्या लेखकांच्या उल्लेखांचा उपयोग करत असतो त्यांना त्या विषयात फार महत्व असल्याचे समजले जाते. या प्रकारच्या वाचनसाहित्याचे ग्रंथालयात उपार्जन करता यावे या दृष्टिकोनातून उल्लेख विश्लेषण ग्रंथालयासाठी एक महत्वाचा स्त्रोत ठरतो. ग्रंथालयातील ग्रंथोपार्जन धोरण ठरविण्यासाठी ग्रंथपालांना उल्लेख विश्लेषणाची अतिशय चांगली मदत होते.

उल्लेख म्हणजे काय ?

संशोधन अहवाल लिहित असताना संशोधक विशिष्ट विषयातील निरनिराळे संदर्भ ग्रंथ हाताळत असतो. संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती प्राथमिक स्त्रोतांबरोबरच दुय्यम स्त्रोतांव्दारे संकलित करीत असतो. हा स्त्रोत कुठून उपलब्ध झाला त्यासंबंधातील माहिती देण्याचे कार्य करीत असतो. यालाच उल्लेख असे म्हणतात. संशोधक आपले विचार मांडत असताना अगोदरच्या संशोधकांच्या विधानाचा आधार घेत असतो व तसे आपल्या लिखाणात नमूद करत असतो. कारण त्या लेखामध्ये त्या लेखकाला काही समानता आढळलेली असते. म्हणून या लेखापूर्वी त्या विषयावर कोणी किती माहिती मिळवली आहे याचा आढावा तो घेत असतो. उल्लेखांचा उपयोग प्रकाशनामध्ये वेगवेगळया कारणांसाठी केला जातो.

यात ज्याच्या त्याच्या कार्याचे श्रेय ज्याला त्याला देण्यासाठी केला जातो. तसेच मांडलेल्या मुद्याचा मूळ तपशील पुरवणे, अधिकच्या माहितीसाठी संदर्भ पुरवणे. लेखक प्रलेखातून आपले विचार मांडत असतो. त्या विचारांच्या समर्थनार्थ तो पूर्वसूरींच्या विधानाचा आधार घेत असतो. सदरचा आधार नेमका कुठला आहे? कुठून प्राप्त झाला आहे? याचा आधार तो देत असतो. हा पुरावा म्हणजेच उल्लेख होय. विशिष्ट विषयांशी संबंधित आधी इतर लेखकांनी मांडलेल्या विचारांचा पुरावा देणे म्हणजेच उल्लेख होय.

व्याख्या :-

१. उल्लेखांबाबत गारफिल्ड यांनी असे मत मांडले आहे की, “Anyone conducting a literature search, can find from one to dozens of additional papers on a subject just by knowing one that has been cited.”

२. संशोधन करत असताना विव्दान लेखकांचा लेख आपल्या संशोधनात लिहिला असेल तर त्याच्या संदर्भ देण्याच्या पध्दतीस उल्लेख असे म्हणतात.

उल्लेखांचा उपयोग :-

१. वेगवेगळया शास्त्रीय विषयातील शोधप्रकार आणि ज्ञानक्षेत्रातील वाढ ओळखण्याकरीता.

२. द्वितीयक प्रलेखांचे व्यापक स्वरुप ओळखण्याकरीता.

३. विविध विषयातील वाचक वर्ग ओळखण्याकरीता.

४. निवडक माहिती प्रसार सेवेचा प्रभाव ओळखण्याकरीता.

५. वेगवेगळया विषयांचे लेखक व त्या विषयातील लेखांचा कल जाणुन घेण्याकरीता.

६. वेगवेगळया विषयातील महत्वाचे नियतकालिके ओळखण्याकरीता.

७. प्रकाशनाच्या क्षेत्रात भूत, वर्तमान आणि भविष्य यांचे प्रकारानुसार अनुमान काढण्याकरीता.

८. योग्य गरज कमी पैशात पुर्ण करणे व योग्य ग्रंथ खरेदी धोरण ठरविण्याकरीता.

९. ग्रंथ रद्दबातल धोरण ठरविण्याकरीता.

१०. कार्यक्षम नेटवर्क प्रणालीची सुरुवात करण्यासाठी.

उद्दिष्टये :-

१. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथून इतिहास, समाजशास्त्र व राज्यशास्त्र विषयात पीएच.डी. प्राप्त प्रबंधातील उल्लेखांचा शोध घेणे.

२. सदरील उल्लेखांचे माहितीसाधनाच्या प्रकारानुसार वर्गीकरण करणे.

३. सदरील उल्लेखांचा भौगोलीक व वर्षनिहाय परामर्श घेणे.

४. उल्लेखित उल्लेखांची भाषानिहाय व लेखकनिहाय माहिती घेणे.

५. ब्रॅडफोर्ड यांच्या सिध्दांतानुसार उल्लेखित साहित्यांची रँक लिस्ट तयार करणे.

गृहीतके :-

१. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे या विद्यापीठातुन इतिहास, समाजशास्त्र व राज्यशास्त्र विषयात पीएच.डी. प्राप्त प्रबंधात मोठया प्रमाणात उल्लेख देण्यात आले आहेत.

२. सदरील उल्लेख वेगवेगळया माहितीसाधन प्रकारातील आहेत.

३. भौगोलिक स्थानानुसार व वर्षानुसार उल्लेखांचा वापर करण्यात आला आहे.

४. विविध भाषेतील व वेगवेगळया लेखकांचे उल्लेख देण्यात आले आहेत.

५. इतिहास, समाजशास्त्र व राज्यशास्त्र या विषयातील संशोधनात जास्तीत जास्त नियतकालीकांचा वापर केला जातो.

संदर्भ साहित्याचा आढावा :-

संदर्भ साहित्याचा आढावा हा जुन्या साहित्याच्या नव्या संदर्भात करण्यासाठी उपयुक्त ठरत असतो. त्यामुळे संशोधकाला नव्या जगातील नवी परिस्थिती लक्षात येते. संशोधनासाठी घेतलेला नवीन विषय प्रत्यक्ष - अप्रत्यक्षरित्या पूर्वी झालेल्या संशोधनाशी निगडीत असतो. संशोधकाने निवडलेल्या विषय क्षेत्रांशी संबंधित साहित्याचे वाचन व मनन हा संशोधनातील अत्यंत महत्वाचा भाग आहे.

"Kalbande, Dattatreya Tryaambakrao and Sonawane, Shashank S. (२०१२), Citation Analysis of Ph.D. Theses on Economics submitted to Dr. Babasaheb Ambedkar Matathwada University, Electronic International Interdisciplinary Research Journal," "आठल्ये, श्रीनिवास मेघःश्याम (२०१८), मुंबई विद्यापीठात सादर केलेल्या मराठी भाषेतील प्रबंधांचे उल्लेख विश्लेषण ", जाधव, वंदना शेषेराव (२०१५), "Citation Analysis phd Theses on physical sciences submitted to Dr. babasaheb Ambedkar Marathwada university Aurangabad",

व्याप्ती व मर्यादा :-

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे या विद्यापीठामध्ये इतिहास (प्रबंध संख्या १४६), समाजशास्त्र (प्रबंध संख्या १२६) व राज्यशास्त्र (प्रबंध संख्या ९१) या विषयात पीएच.डी. साठी सुरुवातीपासून ते आजपर्यंत दाखल झालेल्या संशोधन प्रबंधापुरती मर्यादित असून संभाव्य नमुना निवड तंत्रानुसार सरल यादृच्छिक नमुना निवड पध्दतीव्दारे लॉटरी पध्दतीचा उपयोग करुन ५० % (प्रबंध) नमुना निवडण्यात येणार आहे. त्यानुसार सदरील संशोधन कार्य पूर्ण केले जाणार आहे.

संशोधन पध्दती :-

सदरील संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील बिब्लीओमॅट्रीक्स या पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

माहिती संकलन :-

इतिहास, समाजशास्त्र व राज्यशास्त्र या विषयातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथील पीएच.डी. साठी दाखल झालेल्या संशोधन प्रबंधातुन संदर्भ सूचीच्या सहाय्याने माहितीचे संकलन करण्यात येणार आहे.

विषय निवडी मागची भूमीका :-

संशोधन विषयाची निवड ही समस्या सुत्रणाने होत असते. एखाद्या विषय निश्चित करुन संशोधन कार्याची सुरुवात केली जाते. या हेतूआधारेच विषयाची वास्तविकता, सद्यस्थिती अभ्यासणे गरजेचे वाटते. माहितीचे स्त्रोत हे मोठया प्रमाणात उपलब्ध असल्याचे दिसून येतात. यात निरनिराळया विषयांची मासिके, संदर्भग्रंथ, पीएच. डी प्रबंध, पेटंट, प्रमाणके, वर्तमानपत्रे इ. चा उपयोग माहिती मिळविण्यासाठी केला जातो. प्रस्तूत विषयाची वस्तुस्थिती संशोधन कार्याच्या माध्यमातून

प्रकट करण्यासाठी व सुक्ष्म बाबी साधने जाणून घेण्याकरिता संशोधकाने **“सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, मानव्य विद्याशाखे अंतर्गत सादर केलेल्या विद्यावाचस्पती प्रबंधांचे उल्लेख विश्लेषण”** या विषयाची निवड केली आहे.

<u>ग्रंथपालन व्यवसायाच्या दृष्टीने गरज :-</u>

इतिहास, समाजशास्त्र व राज्यशास्त्र या विषयातील संशोधकांना कोणकोणते ग्रंथ व नियतकालीके महत्वपुर्ण आहेत. त्याचप्रमाणे भारतातील व विदेशातील कोणकोणते ग्रंथ, नियतकालीके, प्रबंध, नोट्स, लेख हे वाचकांसाठी किंवा उपभोक्त्यांसाठी अधिक प्रमाणात उपलब्ध आहेत, उपयुक्त आहेत व वरील साधनांचा संशोधकांनी किती वेळेस उपयोग केला आहे याची माहिती संशोधकाला प्राप्त होणार आहे. तसेच या संशोधनाच्या आधारे इतर विद्याशाखेतील पीएच.डी. प्रबंधाचे तसेच नियतकालीके, रिपोर्टस, नोट्रस, प्रलेख यांचे बिब्लीओमॅट्रीक्स अध्ययन करण्यासाठी हे संशोधन उपयोगी ठरणार आहे.

संशोधन आराखडा

प्रस्तुत संशोधनाची ५ प्रकरणामध्ये विभागणी करण्यात आलेली आहे.

प्ररकण १ रे :- प्रस्तावना

प्रकरण २ रे :- पूर्व साहित्याचा आढावा

प्रकरण ३ थे :- उल्लेख विश्लेषण संकल्पना, उदय, विकास व महत्व

प्रकरण ४ वे :- माहिती संकलन व माहितीचे विश्लेषण

प्रकरण ५ वे :- निष्कर्ष व शिफारशी

:- संदर्भ सूची

संशोधन कार्याचे नियोजन

अ.क्र.	संशोधन कार्याचा तपशिल	कालावधी
१	विषयाची निवड, संशोधन आराखडयाचा अभ्यास	६ महिने
२	पुर्वसाहित्याचा अभ्यास, संदर्भीय वाचनसाहित्य संग्रह	६ महिने
३	दुय्यम साधनाचा आढावा	६ महिने
४	संशोधन विषयाच्या अनुषंगाने माहिती एकत्रित करणे	६ महिने
५	संकलित माहितीचे विश्लेषण करणे	६ महिने
६	संशोधन अहवाल तयार करुन सादरीकरण करणे	६ महिने

संदर्भ सुची :-

१. आगलावे प्रदीप, २००० संशोधन पध्दती आणि तंत्रे, नागपुर, विद्या प्रकाशन.
२. कळमकर श्रीकांत २००७, कृषी संशोधन शिक्षण व माहिती विस्तार केंद्र, बळीराजा खंड ४.
३. कायदे-पाटील गंगाधर, २००६, संशोधन पध्दती, नाशिक, चैतन्य पब्लिकेशनस.
४. कु-हाडे बी. एम., २००७, शास्त्रीय संशोधन पध्दती, नागपुर, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स.
५. जोशी लक्ष्मणशास्त्री, १९७६, मराठी विश्वकोश, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ.
६. जोशी लक्ष्मणशास्त्री, १९८७, मराठी विश्वकोश, मुंबई, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, खंड १२.
७. ढगे उमेश धोडीराम, २००८-२००९, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मराठवाडयातील अभ्यासकेद्रांत एम.लीब. शिक्षणक्रमासाठी सादर केलेल्या संशोधन प्रकल्पांचे बिब्लीओमॅट्रीक्स अध्ययनः एम.लीब. प्रकल्प
८. तरविड व्ही. डी.,२००५, बिब्लीओमॅट्रीक स्टडी ऑफ डॉक्टरल थिसीस इन लायब्ररी ॲन्ड इनफॉरमेशन सायन्स, सबमिटेड टु नागपुर विद्यापीठ, नागपुर
९. तेलगाने के. के. १९९५, बिब्लीओमॅट्रीक स्टडी ऑफ पीएच.डी. थिसीस इन मॅथेमॅटीक्स, एम.लीब. प्रकल्प.
१०. दास्ताने संतोष, २००८, महाराष्ट्र २००८, पुणे, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी.
११. देशपांडे लिना, २००६, सर्वेक्षण : एक संशोधन पध्दती पुष्प ४ थे नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
१२. निकोसे सत्यप्रकाश, २००७, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पध्दती, नागपुर प्रज्ञा प्रकाशन.
१३. पाटील बा. भा., २००६, संशोधन पध्दती, पुणे, प्रशांत पब्लिकेशन्स.
१४. पालकर रत्नाबाई देवराव २००६-२००७, परभणी येथील कृषी विद्यापीठातुन पीएच.डी. साठी सादर केलेल्या संशोधन अहवालाचे बिब्लीओमॅट्रीक अध्ययन : एम.फील. संशोधन प्रकल्प.
१५. रायबोले एस., २००५, सायटेशन ॲनालसिस ऑफ पीएच.डी. थिसीस इन पॉलीटीकल सायन्स, नागपुर विद्यापीठ, नागपुर
१६. रिसवडकर म.रा., २०००, संशोधन व्याख्या आणि पध्दती, खंड ४ था, नाशिक, य.च.म.मु. विद्यापीठ.
१७. शर्मा के. के. (संकलन) आणि पठाण के.जी., २००५, इंटलेक्च्युअल्स संदर्भ महाराष्ट्र राज्य व जिल्हे एक दृष्टीकोन, भोपाळ, इंटेलक्युचअल बुक ब्युरो.
१८. हुडगे मधुबाला गंगाधर, २००६-२००७, मराठवाडा विभागातील सामाजिक शास्त्रे विद्याशाखेशी संबंधीत प्रकाशीत झालेल्या ग्रंथाचे बिब्लीओमॅट्रीक अध्ययन : एम.फील. संशोधन प्रकल्प.

संशोधक
परमेश्वर माणिकराव इंगळे

मार्गदर्शक
प्रा.डॉ. डी. टी. घटकार
संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट